# मान्सूनच्या धारा वाजवणार ठाण्याच्या नियोजनाचे बारा

## रस्त्यांची कामे अर्धवटच... सिमेंट-कॉँक्रीटीकरणही रखडणार

**ठाणे : मान्सूनचे आगमन उशिराने होत असले, तरी त्याचा फटका ठाणे शहरातील अर्धवट स्थितीत असलेल्या रस्त्यांच्या कामांना बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सिमेंट-कॉँक्रीटचे अर्धवट अवस्थेत असलेले रस्ते, यूटीडब्ल्यूटी रस्त्यांची अर्धवट स्थितीत झालेली काही कामे आणि त्यात ड्रेनेज व सिवरेज प्रकल्पाची सुरू असलेली कामे यामुळे यंदाचा मान्सूनही ठाण्याच्या नियोजनाचे तीनतेरा वाजवणार आहे. त्यामुळे मान्सूनच्या धारा बरसू लागल्या तरी ठाण्याची विकासकामे काही पूर्ण होत नसल्याने यंदाही ठाणेकरांना मान्सून दणका देण्याच्या स्थितीत आहे.**



पावसाला सुरुवात झाली तरी ठाण्यातील भास्कर कॉलनीमधील रस्त्यांची कामे सुरूच आहेत. (छायाचित्र : विभव बिरवटकर)

### अडचण होणार नसल्याचा पालिकेचा दावा

**ठरवून दिलेल्या वेळेत कामे पूर्ण झाली नाहीत तर ठेकेदारांवर कारवाई करण्यात येणार आहे. ठेकेदाराने जो रस्ता बांधला आहे त्याची तीन वर्षे देखभाल दुरुस्ती करण्याची जबाबदारीही त्या ठेकेदाराचीच आहे, असे पालिकेने स्पष्ट केले असून त्यामुळे रस्त्यांवर खड्डा पडल्यास संबंधित ठेकेदारावर तो खड्डा भरून देण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. केवळ पाच टक्के काम बाकी आहे. ते एक-दोन दिवसांत संपवण्यात येणार असून त्यानंतर ठाण्यात रस्त्यांची कामे पावसाळ्यानंतर हाती घेण्यात येणार असल्याचे पालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे ठाणेकरांची अडचण होणार नाही, असा दावाही पालिकेने केले आहे.**

ठाणे महापालिका निवडणुकीत ठाण्यातील रस्त्यांच्या दुरवस्थेचा विषय चांगलाच गाजला होता. त्यामुळे सत्ताधारी शिवसेनेने पालिका निवडणुकीच्या आधीच ठाण्यातील रस्ते सुसज्ज राहावेत यासाठी ३३४ कोटींची तरतूद रस्त्यांसाठी केली आहे. त्यानुसार ठाणे महापालिकेने १३० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे डांबरीकरण आणि काही रस्त्यांचे यूटीडब्ल्यूटी पद्धतीने मजबुतीकरण सुरू केले आहे. यातील १०० किमी लांबीच्या रस्त्यांची कामे पावसाळा सुरू होण्यापूर्वी पूर्ण होणे आवश्यक होते. मात्र, नगरसेवकांच्या कमी झालेल्या विकासकामांवरील कंट्रोलमुळे रस्त्यांची कामे करणाऱ्या ठेकेदारांनी चालढकल करीत मनमानीपणाने कामे केली आहेत. त्यामुळे पावसाळा सुरू होण्याची धास्ती असतानाही ठेकेदारांनी काळजीपूर्वक कामे केलेली नसल्याचे काँग्रेसचे नगरसेवक नारायण पवार यांनी सांगितले. कामे चांगल्या दर्जाची झाली आहेत की नाहीत, हे पाहण्यासाठीही ठाणे महापालिकेकडे मनुष्यबळ उपलब्ध नव्हते, असा आरोप त्यांनी केला आहे. काही भागातील रस्त्यांच्या कामांमध्ये लेव्हल न मिळाल्याने रस्त्यावरच पाणी तुंबण्याची भीती पवार यांनी व्यक्त केली आहे.

चरई, तलावपाळी, वागळे इस्टेटमधील जय भवानीनगर आणि भास्कर कॉलनीमधील रस्त्यांची कामे अर्धवट स्थितीत असून मान्सूनच्या धारांचा मोठा फटका त्यांना बसणार आहे. कोपरीतही काही रस्त्यांची कामे अर्धवट झाली आहेत. त्यामुळे या रस्त्यांवर खर्च केलेले कोट्यवधी रुपये पाण्यात जाण्याची भीती व्यक्त होत आहे. त्याशिवाय ठाणेकरांना पावसाळ्यात वाहतूक कोंडीचा त्रास होईल तो वेगळाच आहे.

याबाबत पालिका प्रशासनाचे म्हणणे असे आहे, की ठाण्यातील १३० किमी रस्त्यांचे मजबुतीकरण हाती घेण्यात आले होते. त्यातील १०० किमी रस्त्यांची कामे पावसाळ्यापूर्वी व ३० किमी रस्त्यांची कामे पावसाळ्यानंतर पूर्ण केली जाणार आहेत. ज्या १०० किमी रस्त्यांची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण होणे अपेक्षित होते त्यापैकी ९२ किमी रस्त्यांची कामे पूर्ण झाली असून आठ किमी रस्त्यांची कामे पूर्ण केली जात आहेत. यूटीडब्ल्यूटी रस्त्यांची कामे पावसाळ्यातही करता येतात. त्यांचा दर्जाही चांगल्या प्रकारे राखला गेला आहे. मात्र ज्याप्रमाणे सर्व रस्त्यांच्या पाहणीकरिता इंजिनियर्स असावेत अशी अपेक्षा आहे, त्यानुसार प्रत्येक वेळी काम ज्या ठिकाणी सुरू आहे तेथे अधिकारी देता येतातच असे नाही. पालिकेत अभियंत्यांची कमतरता असल्याने प्रत्येक काम सुरू असलेल्या ठिकाणी अभियंता उपलब्ध करून देणे तांत्रिकदृष्ट्या शक्य होत नाही. मात्र रस्त्यांच्या कामांचा दर्जा राखला गेला आहे की नाही, याची पूर्ण पडताळणी पालिकेकडून करण्यात येत आहे.